MHSO100008062025

**<u>वि.दि.दा.क्र.७९/२०२५ मधील निशाणी क्र.३२ खालील आदेश</u>.**

प्रतिवादी क्र.२ हिने सदरचा अर्ज तिचेविरुद्ध जो विना कैफीयतचा आदेश झाला आहे, तो रद्द होऊन मिळण्यासाठी केलेला आहे. प्रतिवादीने सदरच्या अर्जात कथन केले आहे की, सदरचे दाव्यात ती हजर झाल्यानंतर दाव्याचे कामी आवश्यक असणारी महत्वाची कागदपत्रे तिला वेळेत मिळाली नसल्यामुळे व ती वयोवृध्द व आजारी असल्यामुळे तिला मुदतीत सदरचे दाव्यास कैफियत दाखल करता आली नाही. त्यामुळे तिच्याविरुध्द विना कैफियत चौकशीचा आदेश झाला आहे. प्रतिवादीने जाणीवपूर्वक कैफीयत दाखल करण्यास विलंब केलेला नाही. म्हणून तिने तिचा अर्ज मंजूर करण्याची विनंती केली आहे.

२. सदरचे अर्जास वादीने जबाब दिलेला असून त्यामध्ये त्याने प्रतिवादीच्या अर्जातील सर्व कथन नाकारले आहे. त्याने पुढे म्हटले आहे की, सदरचा अर्ज कायदेशीर नाही. प्रतिवादी क्र.२ ने तिची कैफियत न दिल्यामुळे न्यायालयाने तिच्या विरुध्द विना कैफियत चौकशीचा आदेश पारित केला आहे. शेवटी तिचा अर्ज नामंजूर करण्याची विनंती त्याने केली आहे.

३. वर नमूद केलेल्या कथनांचा विचार करुन माझे विचारार्थ खालील मुद्दे आहेत व त्या मुद्दयावर मी माझे कारणांसह निष्कर्ष नोंदवित आहे.

| | **मुद्दे** | | **निष्कर्ष** |
|---|---|---|---|
| १. | विना कैफीयत आदेश रद्द करणे आवश्यक आहे काय? | ... | **होय.** |
| २. | आदेश काय? | ... | **अंतिम आदेशाप्रमाणे.** |

## कारणमीमांसा

### मुद्दा क्र.१ बाबतः–

४. मी प्रतिवादी क्र.२ तर्फे विद्वान वकील श्री.उराडे व वादीतर्फे विद्वान वकील श्री.जाधव यांचा युक्तिवाद ऐकला. तसेच सदरच्या प्रकरणांमधील संबंधीत दस्तऐवज पाहिले. प्रतिवादी क्र.२ हिला ता.१०.१०.२०२५ रोजी समन्सची बजावणी झाल्याचे दिसून येते. त्यानंतर ३० दिवसाच्या आत म्हणजेच ता.०९.११.२०२५ पावेतो प्रतिवादीने तिची लेखी कैफीयत दाखल केली नाही. प्रतिवादीने विहीत मुदतीत कैफियत दाखल न केल्यामुळे तिच्याविरुध्द विना कैफियतीचा आदेश ता.१८.१२.२०२५ रोजी पारित करण्यात आला आहे. त्यानंतर ता.१३.०३.२०२६ रोजी प्रतिवादीने सदरचा अर्ज दिलेला आहे. सदरचे मुळ दाव्याचे कायमचे निराकरन करण्यासाठी व प्रतिवादीला तिची बाजू मांडणेसाठी संधी देणेसाठी तिच्याविरूद्ध झालेला विना कैफीयत आदेश रद्द करणे आवश्यक आहे. प्रतिवादीला जर सदरची संधी देण्यात आली नाही तर तिला न्याय नाकारले सारखे होईल. त्यामुळे प्रतिवादीच्या विरूद्ध झालेला विना कैफीयत हा आदेश रद्द करणे आवश्यक आहे. म्हणून मी मुद्दा क्र.१ चे उत्तर

होकारार्थी नोंदवित आहे.

**मुद्दा क्र.२ बाबतः–**

५. मी वर नमुद केल्याप्रमाणे सदरचा अर्ज मंजूर करणे आवश्यक आहे. म्हणुन मी मुद्दा क्र.२ चे उत्तरासाठी खालील अंतिम आदेश पारीत करीत आहे.

**आदेश**

सदरचा नि.क्र.३२ चा अर्ज मंजूर करण्यात येत आहे.

Digitally signed by GHANWAT SOPAN DASHRATH
Date: 2026.04.18 17:10:00 +0530

ता.१८.०४.२०२६.

(सोपान द.घनवट)
दिवाणी न्यायाधीश वरीष्ठ स्तर,
माळशिरस.

४ <u>वि.दि.दा.क्र.७९/२०२५ मधील</u>

**नि.क्र.३२ खालील आदेश.**

शेरा

मी शपथेवर सांगतो की, या पी.डी.एफ. आदेश फाईल मधील मजकूर हा मूळ आदेशातील मजकूराशी शब्द न शब्द सारखा आहे.

लघुलेखकाचे नावःश्री. म.पां. सदाफुले.

न्यायालयाचे नावःदि. न्या. व. स्तर, माळशिरस.

आदेशाचा मजकूर सांगितल्याचा दि.१८.०४.२०२६.

आदेश टंकलिखित केलेला दि.१८.०४.२०२६.

आदेश स्वाक्षरीत केल्याचा दि.१८.०४.२०२६.

आदेश अपलोड केल्याचा दि.१८.०४.२०२६.

स्वाक्षरीत/-

(म. पां. सदाफुले)

लघुलेखक ग्रेड – २,

दिवाणी न्यायालय, व. स्तर, माळशिरस.